# २. नागरिकांनी आपली तक्रार कोठे नोंदवावी

## १. नागरिकांनी आपली तक्रार कोठे नोंदवावी

(अ) नागरिकांस आपली तक्रार कोणत्याही पोलीस ठाण्यात नोंदविता येते. गुन्हा कोणत्याही हद्दीत घडला असला तरी, **तक्रारदारास त्या हद्दीतील पोलीस ठाण्यात जा असे म्हणता येत नाही.**

(ब) दखलपात्र गुन्ह्याची फिर्याद नोंदविल्यानंतर त्याची एक प्रत विनाशुल्क फिर्यादीस देण्यात येते.

(क) अदखलपात्र गुन्ह्यात पोलिसांना न्यायालयाच्या आदेशाविना तपासाचे अधिकार नसतात.

## २. रेल्वेच्या हद्दीत गुन्हा घडल्यास तक्रार कोठे नोंदवावी

रेल्वे हद्दीमध्ये अथवा धावत्या गाडीमध्ये एखादा गुन्हा घडल्यास, तो संबंधित लोहमार्ग पोलीस ठाण्यामध्ये दाखल करणे आवश्यक आहे. तसेच काही लांबपल्ल्यांच्या गाड्यांमध्ये 'मोबाईल (फिरते) पोलीस ठाणे' सुरू करण्यात आले आहे. यामुळे धावत्या गाडीत गुन्हा घडल्यास तो या फिरते पोलीस ठाण्यामध्ये दाखल करता येतो. शिवाय लांबपल्ल्यांच्या गाड्यांवर गार्डकडेही तक्रार नोंदविण्याची व्यवस्था आहे.

एखादा गुन्हा घडल्यानंतर प्रवाशाची जर चालू गाडीतून उतरण्याची इच्छा नसल्यास त्याच्या प्रवासाच्या अंतिम ठिकाणी लोहमार्ग पोलीस ठाण्यामध्ये सदर गुन्ह्याची नोंद करू शकतो. अशा प्रकारचे गुन्हे नंतर संबंधित लोहमार्ग पोलीस ठाण्याकडे पुढील तपासाकरिता व इतर रितसर कार्यवाहीकरिता वर्ग करण्यात येतात. जर त्याच्या प्रवासाच्या अंतिम ठिकाणी लोहमार्ग पोलीस ठाणे नसल्यास तो/ती शहरातील जवळच्या पोलीस ठाण्यामध्ये, रेल्वे हद्दीमध्ये घडलेल्या गुन्ह्याची तक्रारीची नोंद करू शकतो/शकते व नंतर ती तक्रार संबंधित लोहमार्ग

पोलीस ठाण्याकडे पाठविण्यात येते.

तसेच प्रवाशास पोलीस ठाण्यामध्ये जाण्याची सोय नसल्यास तो/ती त्याच्याशी रेल्वे हद्दीमध्ये घडलेली तक्रार लेखी स्वरूपाच्या अर्जामध्ये संबंधित लोहमार्ग पोलीस ठाण्यास पाठवू शकतात. जर प्रवाशास निश्चित लोहमार्ग पोलीस ठाणे माहीत नसल्यास ते कोणत्याही लोहमार्ग पोलीस ठाण्यास अथवा मुंबई लोहमार्ग आयुक्त कार्यालयास अथवा विशेष पोलीस महानिरीक्षक, लोहमार्ग, मुंबई यांचे कार्यालयास लेखी तक्रार पाठवू शकतात. अशा प्रकारे प्राप्त झालेल्या तक्रारीची संबंधित लोहमार्ग पोलीस ठाण्यामध्ये नोंद करून घेण्याची कार्यवाही करण्यात येते.